# क्विक हिल सायबर क्लबच्या उद्घाटन सोहळ्यात योगेश्वरी महाविद्यालयाचा समावेश

## २२ विद्यार्थी करणार सायबर सुरक्षा विषयी जनजागृती

अंबाजोगाई प्रतिनिधी

अंबाजोगाई येथील योगेश्वरी महाविद्यालयाच्या संगणक विभागा ने क्विक हील फाउंडेशन सोबत सामंजस्य करार करून सायबर सुरक्षा विषयी जनजागृती करण्यासाठी सायबर वॉरियर क्लब ची स्थापना करून २२ विद्यार्थ्यांची सायबर वॉरियर म्हणून निवड केली.

दिनांक सहा ऑगस्ट रोजी या क्लबचे उद्घाटन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर येथे पार पडले.

या सोहळ्यासाठी सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रोफेसर प्रकाश महानवर अध्यक्षस्थानी होते. प्रमुख अतिथी म्हणून



क्विक हील फाउंडेशनच्या चेअरमन श्रीमती अनुपमा काटकर ह्या होत्या. याप्रसंगी सायबर सुरक्षा अभियानाचे प्रमुख श्री अजय शिर्के यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना

अभियानाबद्दल सखोल मार्गदर्शन करून प्रेरित केले. श्रीमती अनुपमा काटकर व प्रोफेसर महानवर यांच्या हस्ते क्लब ऑफिसर व शिक्षक प्रतिनिधी यांचा सत्कार करण्यात

आला यामध्ये आदर्श डोंगरे - क्लब प्रेसिडेंट, साक्षी चौधरी - क्लब सेक्रेटरी, भार्गवी कुलकर्णी - कम्युनिटी डायरेक्टर, प्रणाली थावरे - पी आर मीडिया डायरेक्टर तसेच संगणक विभागाचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. आर जी जोशी व प्राध्यापक अनुजा रामदासी यांचा सत्कार करण्यात आला.

क्विक हील फाउंडेशन च्या वतीने श्रीमती गायत्री केसकर सीएसआर एक्झिक्युटिव्ह यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रयत्न केले. निवड झालेले एकूण २२ विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक प्रतिनिधी मिळून अंबाजोगाई व परिसरात सायबर सुरक्षे विषयी विविध माध्यमातून नियोजनबद्ध पद्धतीने जनजागृती करणार आहेत. निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ. एम बी शेटीकर, उपप्राचार्य डॉ. आर व्ही कुलकर्णी तसेच संगणक विभागाचे प्रा. डॉ. महेंद्र आचार्य यांनी अभिनंदन केले आहे.